गोदातीर समाचार दि. ०७

# चैनस्नॅचिंग करणारा अल्पवयीन बालक २४ तासांच्या आत मुद्देमालासह ताब्यात

गोदातीर स. ०७/०१/२०२३.

## वजिराबाद गुन्हे शोध पथकाची कामगिरी

**नांदेड** – वजीराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्नॅचिंग केलेले मनीमंगळसुत्र व चोरीची मोटरसायकल असा एकुण ५९ हजार ३०० रुपयाचा ऐवज वजिराबाद पोलिसांच्या गुन्हे शोध पथकांनी जप्त केला आहे.

गुरुवार दि. ५ जानेवारी रोजी सकाळी ६.४० ते ६.५० वाजताचे दरम्यान शहरातील जवाहरनगर येथे एक महिला कचरा कुंडीत कचरा टाकण्यासाठी जात असतांना ज्ञानश्री हॉस्टेलजवळ सदर महिलेच्या समोरुन एका मोटरसायकलवर आलेल्या दोन अनोळखी इसमांनी महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मनी मंगळसुत्र हिसकाऊन मोटरसायकलवरून पसार झाले. या प्रकरणात विमानतळ पोलिस ठाण्यात येथे भारतीय दंड विधानप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास सपोनि एन.आर. आनलदास करत आहेत.

चंद्रसेन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली वजिराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार, गुन्हे शोध पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय निलपत्रेवार, पोलीस अंमलदार दत्तराम जाधव, गजानन किडे, पोना शरदचंद्र चावरे, संतोष बेलुरोड, व्यंकट गंगुलवार, बालाजी कदम, रमेश सुर्यवंशी, शेख ईम्रान हे नमुद चैन स्नॅचिंगमधील गुन्हेगाराचा शोध घेत असतांना मिळालेल्या माहितीनुसार अभिलेखावरील विधीसंघर्षग्रस्त बालक व त्याच्या साथीदाराने

(पान ६ वर...)

पान १ वरून

### चैनस्नॅचिंग करणारा अल्पवयीन ...

सदरचा गुन्हा केला आहे.

तो सध्या हिंगोली गेट उड्डानपुलाखाली सिगारेट पित बसलेला आहे. त्यावरुन नमुद पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सापळा रचुन सदर विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेऊन त्याची चौकशी केली.

त्यांनी सदरची चैन स्नॅचिंग त्याचे साथीदाराचे मदतीने केली असल्याचे सांगितले. पोलीस स्टेशन भाग्यनगर हद्दीतील कैलासनगर येथुन मोटारसायकल चोरी केल्याचे सांगितले आहे. तसेच त्याच्याकडे सोन्याचे मनी व मंगळसूत्र असे ४ ग्रॅम ८४० मिलीग्रॅम किंमती १९ हजार ३६० रुपयाचे व एक चोरीची मोटरसायकल किंमती ४० हजार असा ५९ हजार ३६० रुपयाचा ऐवज जप्त करण्यात आला. या प्रकरणी पोलीस ठाणे विमानतळ गु.र.न. ०६/२०२३ कलम ३९२, ३४ व पोलीस ठाणे भाग्यनगर गु.र.न. ०९/२०२३ कलम ३७९ भारतीय दंड विधान असे दोन गुन्हे उघडकीस आणले आहेत.